REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2023

# ''जुन्नर तालुक्यातील आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात शासकीय योजनांचे योगदान''

प्रा. मीना तुळशीराम बांबळे[1] , डॉ. संगिता साळवे[2]
[1]संशोधक विद्यार्थीनी, प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्याल, आकुडी, पुणे.
[2]विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक,डॉ. अरविंद तेलंग महाविद्यालय, निगडी, पुणे.

**गोषवारा :**



जगभरातील महिलांचा अभ्यास करताना, प्राचीन काळापासून ब्रिटीश राजवटीपासून स्त्रियांना अबला समजून त्यांचे अधिकार हिरावून घेतले जातात. भारतीय संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थिान दिले जाते. स्त्रियांना स्त्रीधनाचा हक्क सोडून इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार दिला जात नाही. ब्रिटीश राजवटीपासून स्त्रियांची झालेली फरफट पाहून स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न सुरू झाले. याच पार्श्वभूमीवर २०व्या शतकाच्यां पूर्वार्धात स्त्रियांनी घराची पायरी ओलांडून त्यांच्या स्वहक्कासाठी संघटीत होऊन चळवळी सुरू केल्या. या सर्वांची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेने (युनो) घेतली व १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात आला. तसेच भारत सरकारने १९९३ मध्ये महिला आयोग व २००१ हे महिला सबलीकरण वर्ष म्हणून साजरे केले. परंतु सद्यस्थिती भारतातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा आढावा घेतला असता, जागतिक पातळीवर १२८ देशामध्ये ११५ या क्रमांकावर भारताचे स्थान आहे. पर्यायी पुरूषाच्या तुलनेत स्त्रियांनी समानतेची वागणूक, निर्णयातील सहभाग, समान दर्जा यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येते. म्हणून महिला सक्षमीकरण ही काळाची गरज निर्माण झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण ४८.५% महिलांपैकी ९०% महिला या अकुशल होत्या.

**प्रस्तावना :**

आदिवासी जीवनाविषयीची एखादी कादंबरी किंवा कथा वाचली किंवा जव्हार, जुन्नर या तालुक्यांच्या ठिकाणी आठवड्याच्या बाजाराला नटून थटून आलेली एखादी आदिवासी स्त्री पाहिली की, साहजिकच मनात विचार येतो की, शेतकरी स्त्रियांपेक्षा या आदिवासी स्त्रिया किती आनंदी, स्वच्छंदी असतात. त्यांच्या समाजात त्यांना किती स्वातंत्र्य आहे, तेथे त्यांना कोणतीच बंधने किंवा समस्या नाहीत. परंतु हे विचार आदिवासी भागामध्ये प्रत्यक्ष जाऊन आल्यावर त्यांच्या चालीरीती, धार्मिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केल्यावर विरून जातात. या आदिवासी स्त्रियांच्या स्वच्छंदी जीवनालाही काही बाजू आहे. त्यांनाही काही समस्या आहेत.[1] महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलास (यवतमाळ जिल्हा), कातकरी (रायगड व ठाणे जिल्हा) आरि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्रशासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत.

आदिवासी हा इंग्रजीतील अॅबॉरिजिनीझ या शब्दाचा मराठी पर्यायी शब्द आहे. त्यांना वनवासी म्हणजे आदिवासी म्हणू नये असाही एक दृष्टीकोन आहे. आदिवासी हे वेगळी अस्मिता किंवा संस्कृती नसून ते इतर नागरिकांप्रमाणेच आहेत. वाढत्या लोकसंख्येचा विस्तार, भौगोलिक विस्तार, आधुनिकीकरणाचा वाढता वेग या सर्व गोष्टींचा आदिवासींच्या जीवनशैलीवर प्रभाव पडला आहे. मातृसत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहेत. ऑस्ट्रेलियातील व आफ्रिकेतील काही जमाती मातृसत्ताक आहेत. ब्रिटीश कोलंबिया या देशात मातृप्रधान दिसत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांच्या भावनेकडे जाते. आदिवासी समाजातील वृद्ध व्यक्ती, अपंग शारिरीक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती निराधार विधवा महिला यांच्यासाठी शासनाच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या जातात. आदिवासी महिलांसाठी काही योजना केंद्रशासनामार्फत राबवल्या जातात. या योजना आदिवासी महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे दिसून येत आहे. आदिवासी महिलांसाठी शासन संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी अपंग निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, आम आदमी विमा योजना अश्या अनेक योजना शासन आदिवासी महिलांसाठी राबवत असते.[२]

## अभ्यास विषयाची निवड :

सामाजिक जीवनात मनुष्य म्हणून इतरांसारखे जीवन जगणे सन्मानजन्य बाब आहे. परंतु अशा प्रकारचे जीवन आपणास जगता येत नाही ही खंत आदिवासी महिलांमध्ये पाहण्यास मिळते. आदिवासी महिलांसाठी केंद्रशासन, राज्यशासन, महिला व बालविकास तसेच ग्रामपंचायतीकडून विविध योजना राबवल्या जातात. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. दक्षिणेला मुळशी पर्यंतचा पश्चिम पट्टा व घाट माथ्याचा परिसर हा आदिवासी लोकसंख्येने व्यापलेला आहे. कोणत्याही समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधरावयाची असेल तर त्यासाठी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे. शिक्षणाने समाजाचा आर्थिक, सामाजिक व मानसिक विकास होण्यास मदत होते. आदिवासी महिलांना राबवल्या जाणाऱ्या योजनांची उद्दिष्टे साध्य झाली किंवा नाही? योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या प्रमुख समस्या कोणत्या? योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत आहे का? आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन कोणत्या योजना राबवत आहे? इत्यादी बाबींचा आढावा घेण्यासाठी जुन्नर तालुक्यातील आदिवासी महिला हा विषय संशोधनासाठी जाणीवपूर्वक निवडला असून अभ्यास विषयाचे शीर्षक ''जुन्नर तालुक्यातील आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात शासकीय योजनांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास'' असे आहे.

## अभ्यास विषयाची उद्दिष्टे :

१) जुन्नर तालुक्यातील आदिवासी महिलांसाठी राबविण्यात आलेल्या योजनांची लाभप्रदता अभ्यासणे.
२) आदिवासी महिलांच्या स्वावलंबन, क्षमता आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
३) आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माहितीचा आढावा घेणे.
४) आदिवासी महिलांना भेडसावणाऱ्या सामाजिक व आर्थिक समस्या अभ्यासणे.
५) शासकीय योजना आरि सक्षमीकरण यामुळे आदिवासी स्त्रियांच्या बदलातील भूमिका अभ्यासणे.
६) सर्व स्तरावर होणारे आदिवासी स्त्रियांचे शोषण थांबवणे व त्यासाठी प्रभावी योजना आखणे

## गृहितके :

१) आदिवासी महिलांना शासनाकडून राबविण्यात आलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी असमाधानकारक आहे.
२) आदिवासी महिलांना आर्थिक व सामाजिक समस्यांना सतत तोंड द्यावे लागत आहे.

## संशोधन पद्धती :

संशोधन करीत असताना वास्तविक माहिती गोळा करावी लागते. संशोधन पद्धतीमुळे संशोधन विषयाची योग्य मांडणी करता येते. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला असतो. प्रस्तुत संशोधनासाठी वेगवेगळ्या माध्यमातून पुस्तकांमधून, संशोधन प्रबंध, मासिके, वेबसाईट, लघुशोधप्रबंध यांमधून माहिती संकलित करण्यात आलेली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या घटकांचे अध्ययन करताना जेव्हा विशिष्ट घटकांची पदसंख्या खूपच अधिक असते. तेव्हा प्रत्येकाचा अभ्यास करणे शक्य नसते. तेव्हा अशा सर्व चलांमधून त्या विशिष्ट चलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काही निवडक चलांची निवड करावी लागते. व त्या निवडलेल्या चलांचा अभ्यास करूनच त्याआधारे आलेले निष्कर्ष संपूर्ण घटकाला किंवा त्या गटाला लागू केले जातात. अशा पद्धतीला नमुना निवड पद्धत असे म्हणतात.[३]

## प्राथमिक सामग्री :

महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची माहिती खालीलप्रमाणे-

### तक्ता क्र. १.१ महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या (१९७१ ते २०११)

| अ.क्र. | वर्षे | राज्याची एकूण लोकसंख्या (लाख) | आदिवासी लोकसंख्या (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| २ | १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| ३ | १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ |
| ४ | २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५ |
| ५ | २०११ | ११२३.७४ | १०५.१० | ९.३५ |

संदर्भ : आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र.[४]

१९८१ ते १९९१ या दशकात महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंक्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलना केल्यास असे दिसते की, आदिवासी लोकसंख्येच्या वाढीची ही टक्केवारी कमी अधिक प्रमाणात सातत्याने ९.१९ ते ९.२७ टक्के एवढी राहिलेली आहे. महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, पावरा, महादेव कोळी, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत. या जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त आदिवासींची संख्या धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक व ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आहे.

## तालुक्याची निवड :

### तक्ता क्र. १.२ पुणे जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या

| अ.क्र. | तालुका | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | जुन्नर | ४०८८२ | ४००४० | ८०९२२ |
| २ | आंबेगाव | २५३९९ | २५३०५ | ५०७०४ |
| ३ | शिरूर | ६१९३ | ५८३७ | १२०३० |
| ४ | खेड | २५१८० | २४१११ | ४९२९१ |
| ५ | मावळ | १४९५० | १४२५८ | २९२०८ |
| ६ | मुळशी | ३८०९ | ३६०९ | ७४१८ |
| ७ | हवेली | २७१२४ | २३५५३ | ५०६७७ |
| ८ | पुणे शहर | १९२६२ | १७४४६ | ३६७०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | दौंड | ४९३१ | ४७४२ | ९६७३ |
| १० | पुरंदर | ३१३० | २९४६ | ६०७६ |
| ११ | वेल्हे | १०३३ | ९९९ | २०३२ |
| १२ | भोर | २७८६ | २६२८ | ५४१४ |
| १३ | बारामती | २०३८ | १९१९ | ३९५७ |
| १४ | इंदापूर | २४१५ | २३५१ | ४७६६ |
| | एकूण | १७९१३२ | १६९७४४ | ३४८८७६ |

संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. १७५.[५]

पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. या १४ तालुक्यात २०२०-२१ मध्ये आदिवासींची लोकसंख्या ३४८८७६ एवढी असून स्त्रियांची लोकसंख्या १६९७४४ एवढी आहे. या तालुक्यांपैकी ज्या तालुक्यामध्ये आदिवासी स्त्रियांची संख्या जास्त आहे. अशा एका तालुक्याची निवड केलेली आहे.

**तालुक्याची निवड : तक्ता क्र. १.३ निवडलेला तालुका व आदिवासी स्त्रियांची संख्या**

| अ.क्र. | तालुका | पुरुष | स्त्री | एकूण | नमुना निवडीसाठी निवडलेली संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | जुन्नर | ४०८८२ | ४००४० | ८०९९२ | ४०० |

संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. १७६.[६]

पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. पुणे जिल्ह्यातील ज्या तालुक्यात सर्वांत जास्त आदिवासी स्त्रियांची संख्या आहे. अशा एका तालुक्याची निवड केलेली आहे. जुन्नर तालुक्यात २०२०-२१ मध्ये आदिवासींची एकूण लोकसंख्या ८०९९२ एवढी आहे. या लोकसंख्येत आदिवासी स्त्रियांची संख्या ४००४० एवढी आहे. आणि या स्त्रियांपैकी १% म्हणजेच ४०० कुटुंबांची अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली आहे. जुन्नर तालुक्यात २०२०-२१ या वर्षी आदिवासींची एकूण लोकसंक्या ८०९९२ एवढी आहे. या लोकसंख्येत आदिवासी स्त्रियांची लोकसंख्या ४००४० एवढी असून ही एकूण लोकसंख्येच्या ४९.४३टक्के एवढी आहे.

**आदिवासी महिलांसाठी शासनाच्या योजना :**

**१)नवसंजीवनी योजना :**

आदिवासी भागातील माता मृत्यूप्रमाण व अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १६ जिल्ह्यातील ८४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबवण्यात येते. या योजनेअंतर्गत २८१ फिरती वैद्यकीय पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. वैद्यकीय पथकांमध्ये एका वैद्यकीय अधिकाऱ्यासह प्रशिक्षित रुग्णसेवक व वाहन यांचा समावेश होतो. ही पथके प्रत्येक गावाला व वस्तीला भेट देऊन आदिवासी महिलांना वैद्यकीय सुविधा पुरवितात. नवसंजीवनी योजनेमुळे अदिवासी महिलांचे मृत्यूचे प्रमाण कमी झाल्यामुळे स्त्री-पुरूष यांचे गुणोत्तर यांचा समतोल साधण्यास मदत झाली आहे.

**२)मातृत्व अनुदान योजना :**

मातृत्व अनुदान योजना ही आदिवासी भागातील गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व नोंदणी नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक ती औषधे पुरविल्या जातात. या योजनेअंतर्गत प्रसूतीपूर्व तपासणीकरिता वैद्यकीय केंद्रात जाण्यासाठी ४०० रोख रुपये देण्यात येतात. व ४०० रुपयांची औषधे मोफत पुरविण्यात येतात. मातृत्व अनुदान योजनेमुळे ज्या महिला आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत त्यांचा फायदा झालेला आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविले.

**तक्ता क्र. १.४ मातृत्व अनुदान योजनेची प्रगती (२०१८-१९ ते २०२०-२१)**

| अ. क्र. | वर्षे | खर्च (कोटी) | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | ४.९२ | ६६.८५१ |
| २ | २०१९-२० | २.४८ | ४६.३९३ |
| ३ | २०२०-२१ | ०.६० | १४.८८३ |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. २१६.[७]

### ३) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना :

ही योजना अनुसुचित आदिवासी स्त्रियांसाठी १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येते. ही योजना अदिवासी स्त्रियांमध्ये गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना एक वेळचा पूर्ण आहार आणि सात महिने ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना पुरविण्यात येते. या योजनेचे उद्दिष्ट्ये बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे असे आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे गरोदर स्त्रीने जन्म दिलेल्या बालकांमध्ये कुपोषण ही समस्या गंभीर असल्याचे आढळून आले. जेणेकरून आदिवासी भागातील महिलांना सकस आहार म्हणून बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी होईल.

**तक्ता क्र. १.५ अमृत आहार योजनेची प्रगती (२०१८-१९ ते २०२०-२१)**

| अ. क्र. | वर्षे | लाभार्थी संख्या | खर्च (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | ९९००९७ | १४४.१८ |
| २ | २०१९-२० | ७७२००० | १७५.६९ |
| ३ | २०२०-२१ | ७९७४६५ | ६७.८६ |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. २६१.[८]

### ४) शबरी आदिवासी घरकुल योजना :

ही योजना आदिवासी महिलांसाठी राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामीण भागातील साधारण क्षेत्रातील लाभार्त्याला २६९ चौ.फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी १.३२ लाख व १.४२ लाख अनुदान देण्यात येते. नागरी भागातील लाभार्थ्यांना २६९ चौ.फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी २.५० लाख रुपये अनुदान देण्यात येते. २०१९-२० मध्ये एकूण ३३५३८ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून ९७३२ घरकुलांचे काम पूर्ण झालेली आहेत. ग्रामीण भागातील लोकांच्या घराचे स्वरूप कच्च्या स्वरुपाचे आहे. परंतु सरकारने शबरी आदिवासी घरकुल योजना राबवल्यापासून तेथील लोकांच्या घराचे स्वरूप पक्क्या स्वरुपाचे झाले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारलेला आहे.

### ५) जननी सुरक्षा योजना :

प्रसुतीस चालना देऊन आदिवासी कुटुंबातील बालामृत्यू व मातामृत्यू कम करण्याकरिता जननी सुरक्षा योजना राबण्यात येत आहे. मातामृत्यू कमी करणे हे या योजनेचे ध्येय आहे. प्रसुती झाल्यानंती सात दिवसांच्या आत ग्रामीण भागात ७०० व नागरी भागात ६०० लाभार्थ्यांना दिले जातात.

**तक्ता क्र. १.६ जननी सुरक्षा योजनेची प्रगती (२०१९-२० ते २०२१-२२)**

| अ. क्र. | वर्षे | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | २.७१ | ४७.५५ |
| २ | २०२०-२१ | २.५१ | ४३.११ |
| ३ | २०२१-२२ | १.३७ | ११.७३ |

संदर्भ : महाराष्ट्र आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२१-२२, पृ. क्र. २०४.[९]

**६)शासकीय आश्रम समूह योजना :**

आदिवासींच्या मुलांसाठी शैक्षणिक विकासासाठी कार्यरत असलेल्या स्वेच्छा संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना १९५३-५४ पासून अनुदान देण्यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. शासकीय आश्रम समूह योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी हा आदिवासीच असावा लागतो. तसेच मुला-मुलीस ३१ जुलैला ५ वर्षे पूर्ण असावी, प्रवेश देतेवेळी जाती/जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, पहिली व्यतिरिक्त इतर वर्गाच्या प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला, आश्रमशाळेच्या १ किमी. परिसरातील मुला-मुली आदिवासी म्हणून व त्या क्षेत्राच्या बहेरील निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश⁄सावा लागतो.

**७)शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारी योजना :**

मुलांना शिक्षणासाठी प्रोत्सवान देणे व पालकांवरील आर्थिक भार कमी करणे यासाठी राज्याशासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना सवलती देत आहे. ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे विशेषत: मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु शासनाच्या या योजनेअंतर्गत मुला-मुलींना आर्थिक अनुदान पुरवले जाते. योजनांचा ग्रामीण भागातील मुलींना मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे.

**तक्ता क्र. १.७ शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारी योजनेची प्रगती (२०१९-२०-२०२१-२२)**

| योजना | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२५२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (कोटी) |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | ०.०१ | ०.०२ | - | - | ०.०१ | ०.१० |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२१-२२, पृ.क्र.१९८.[१०]

**८)आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना :**

आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्यशासनाने ही शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये दोन लाभार्थ्यांना १.२४ कमोटी रुपये निधी खर्च केला आहे. तर २०२१-२२ या वर्षात ५ विद्यार्थ्यांकरिता डिसेंबरपर्यंत १.८६ कोटी खर्च झालेला आहे. ग्रामीण भागातील मुला-मुलींचे उच्च शिक्षण व्हावे यासाठी आर्थिक साध्य निधी देऊन त्या भागातील मुला-मुलींचे परदेशातील प्रमाण वाढविण्यासाठी राज्यसरकारने आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. यामुळे आदिवासींच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या सोयी-सुविधा मिळण्यास मदत झालेली आहे.

**९)राजीव गांधी अपघात विमा योजना :**

आदिवासी विद्यार्थ्यांकरिता अपघातामुळे पोहोचलेल्या क्षतिची काही प्रमाणात भरपाई देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरिता राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या मान्यताप्राप्त शाळा, महाविद्यालये यामधून शिकत असल्यास विद्यार्थ्यांसाठी सन २००३ पासून ही योजना चालू केली आहे. या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू ३००००/-, कायमचे अपंगत्व (दोन अवयव, डोळे किंवा एक डोळा निकामी) ५००००/-, अपघातामुळे एक अवयव किंवा डोळा निकाळी २००००/-, अपघातामुळे उद्भवलेला वैद्यकीय खर्च १२०००/-, पुस्तके हरवल्यास ३५०/-, परिक्षा शुल्क ६५०/-, सायक्ल चोरीला गेल्यास १५००/-, अपघातामुळे चष्मा हरवल्यास ७५०/-. अशी आदिवासी लोकांना मदत देण्यात येते. विमा हा ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. या कंपनीमार्फत उतरवण्यात येतो.

## निष्कर्ष :

माझे पीएच. डी. चे काम चाल असून सदर रिसर्च पेपर तयार करताना मिळालेल्या साहित्यावरून काही निष्कर्ष काढण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे :

१) दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन आदिवासी कुटुंबातील सबलीकरण व स्वाभिमान योजनांची अंमलबजावणी झाली नाही.

२) आदिवासी विकासाचा एकूण निधीच्या ६० टक्के निधी जिल्ह्यावरून जिल्हा नियोजन विभागामार्फत आदिवासी विकासासाठी खर्च केला जात असताना आदिवासी लोकप्रतिनीधी व लोकांना घेतले जात नाही असे दिसून आले.

३) नवसंजीवन योजना आदिवासी समाजातील उपकारक असून योजनेची उद्दिष्टये चांगले आहेत. अध्ययन क्षेत्रात ही योजना आदिवासी लाभधारकाला माहित नसून या योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले.

५) आदिवासी परिसरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नसून डॉक्टरांकडून प्रबोधन होत नसल्याचे दिसून आले.

६) आदिवासी विकास विभागामाफ्त राज्यस्तरावरून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत आदिवासी लोकांची प्रगती घडवून आणण्यासाठी शैक्षणिक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासाच्या योजना राबवल्या जातात.

७) आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. परंतु या बाबी आदिवासी महिलांपर्यंत पोहोचल्या नाहीत. यामुळे आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करण्यात अपेक्षित यश आले नाही.

वरील सर्व योजनांमुळे महिलांचे सबलीकरण व्हायला पाहिजे या उदात्त विचाराने प्रेरित होून हिलिली आहे. यातून महिलांचे अधिकार व हक्कांची जाणीव होतेच त्याचबरोबर आधुनिक बदलत्या प्रवृत्तीचा अभ्यास यातून स्पष्ट हातो. महिलार प्रकाशित झालेले हे संशोधनाचा खूप मोठा आधार होऊन नवी विकासात्मक मुल्यांची निर्मिती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

## सारांश :

वरील संशोधन हे जुन्नर तालुक्यातील आदिवासी महिलांचे सक्षमीकरण व्हायला पाहिजे या उदात्त विचताराने प्रेरित होऊन लिहिलेले आहे. या संशोधनातून आदिवासी महिलांमध्ये अधिकार व हक्कांची जाणीव तर होतेच त्याचबरोबर आधुनिक बदलत्या परिवेशात सक्षमपणे समोर जाऱ्याचे पाठबळ या संशोधनातून प्राप्त होताना दिसून येते. म्हणून आदिवासी महिलांवर प्रकाणित झालेले हे संशोधन साहित्य संशोधनाचा खूप मोठा आधार होऊन नवी विकासात्मक मुल्यांची निर्मिती करण्यात महत्त्वाची मूमिका बजावेल हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आणि सत्य आहे.

## संदर्भ सूची :

१) आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र.

२) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. १७५.

३) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. १७६.

४) महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. २१६.

५) महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२०, पृ.क्र. २६१.